साप्ताहिक
# दर्शक
E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266
वर्ष ३६ अंक १९ सोमवार २१ ते रविवार २७ डिसेंबर २०२० किंमत रु.२




## विचारधाराचा ३ जानेवारीला सावित्री उत्सव
## सावित्री -फातिमा पुरस्कार वितरण




अहमदनगर (दि २४ डिसेंबर २०२०) : गेल्या तीन वर्षापासून विचारधारा ३ जानेवारी रोजी सावित्री उत्सव राष्ट्रीयसण म्हणून साजरा करीत आहे. काल राज्य मंत्री मंडळाने दि. ३ जानेवारी हा महिला शिक्षण दिन म्हणून जाहीर केला आहे. या निमित्ताने २०२१ पासून उत्सवात शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणार्या ५ महिलांचा सावित्री फातिमा पुरस्काराने सन्मान करणार असल्याची माहिती विचारधाराचे अध्यक्ष विठ्ठल बुलबुले, जिज्ञासाच्या संचालिका संगीताताई गाडेकर यांनी दिली आहे.आजच्या स्त्रिया प्रगल्भ आणि प्रगतशील दिसत आहेत. त्याचे मूळ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी त्या काळात बहुजनांच्या शिक्षणासाठी ज्या खस्ता खाल्या अंगावर शेण दगड झेलल्या, मनाला बोचणार्या शिव्याशाप खाल्या तरी मुलींनी शिकावे त्यांनी प्रगल्भ व्हावे म्हणून झटल्या, त्यासाठी अपर मेहनत घेतली म्हणून आज स्त्रियांनी घरातील माजघरा पासून ते आकाशातील विमान उडाण करण्यापर्यंत मजल गाठली म्हणून सावित्रीबाई फुले यांच्या बद्दल कृतज्ञाता व्यक्त करण्यासाठी राष्ट्र सेवादल आणि विविध पुरोगामी संघटना गेली अनेक वर्षे नव्या वर्षातील पहिला राष्ट्रीय उत्सव म्हणून सावित्री उत्सव साजरा करीत आहेत. यानिमित्ताने सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून साथ देणार्या फातिमा शेख यांचे ही योगदानाला सलाम करण्यासाठी नवीन वर्षापासून शिक्षण क्षेत्रात कार्यकरणार्या महिलांना विचारधारा व सावित्री उत्सव च्या वतीने सावित्री फातिमा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. सावित्री उत्सव हा संपूर्ण अहमदनगरचा उत्सव व्हावा यासाठी लवकरच व्यापक बैठक घेऊन उत्सवाच्या स्वागताध्यक्ष निवडण्यात येईल व त्यांच्या नेतृत्वाखाली दि ३ जानेवारी ते दि ३० जानेवारी (म.गांधी स्मृतिदिन) पर्यंत विविध उपक्रम करण्यात येणार आहे अशी माहिती विठ्ठल बुलबुले व संगीताताई गाडेकर यांनी दिली.

# इंग्लंडहून जिल्ह्यात आलेल्या प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी होणार

### नागरिकांनी घाबरून न जाता प्रतिबंधात्मक नियम पाळण्याचे जिल्हाधिकारी डॉ. भोसले यांचे आवाहन

अहमदनगर, दिनांक २४- इंग्लंडमधील कोरोना विषाणूमध्ये झालेल्या बदलाच्या पार्श्र्वभूमीवर त्या देशातून मायदेशात परत आलेल्या प्रवाशांच्या सर्वेक्षणासाठी केंद्र सरकारने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार, दिनांक २५ नोव्हेंबर ते २३ डिसेंबर या काळात इंग्लंडहून आलेल्या प्रवाशांचे विशेष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. जिल्ह्यात या कालावधीत इंग्लंडहून आलेल्या नागरिकांनी स्वत:हून माहिती देऊन जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आरटीपीसीआर चाचणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासन आणि राज्य व केंद्र शासनाने दिलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करावे, घराबाहेर पडताना चेहऱ्यावर मास्क वापरावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले यांनी केले आहे. विमानतळ आरोग्य अधिका-यांकडून २५ नोव्हेंचर ते २३ डिसेंबर या काळात इंग्लंडहून मुंबईत उतरलेल्या



प्रवाशांची यादी जिल्हा व महानगरपालिका प्रशासनाला प्राप्त झाली आहे. जिल्ह्यातील १३ नागरिक इंग्लंडहून जिल्ह्यात आले असून यातील ११ जण नगर शहरातील असून उर्वरित दोघे ग्रामीण भागातील आहेत. ग्रामीण भागातील दोघांपैकी एक जण अद्याप मुंबई येथे आहे. दुसरा प्रवाशी पुणे येथे असून त्याची चाचणी निगेटिव्ह आली असल्याची माहिती आरोग्य यंत्रणेने दिली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील प्रवाशांची आरटीपीसीआर चाचणी केली जाणार आहे. या चाचणी मध्ये बाधित आढळलेल्या रुग्णांचे नमुने जनुकीय तपासणीसाठी एन आय व्ही पुणे येथीपाठविण्यात येतील. या तपासणीतून सदर विषाणू इंग्लंडमधील नवीन विषाणू स्ट्रेनशी मिळताजुळता आहे का, याची माहिती मिळेल.जे प्रवासी निगेटिव आढळतील त्यांचा पाठपुरावा ते भारतात आल्यापासून पुढील २८ दिवस करण्यात येईलया प्रवाशांपैकी जे आरटीपीसीआर पॉझिटिव्ह येतील त्यांना इतर कोविड १९ रुग्नापेक्षावेगळ्या आयसोलेशन विभागात भरती करण्यात येईल. या रुग्णांच्या निकट सहवासितांचा शोध घेण्यात येऊन त्या सर्वाना संस्थात्मक कारंटाईन करण्यात येईल. सर्व निकट सहवासीताना ते पॉजीटिव्ह रूग्नाच्या संपर्कात आल्यापासून ५ व्या ते १०व्या दिवसादरम्यान आरटीपीसीआर चाचणी करण्यात येईल.जिल्ह्यात २५ नोव्हेंबर नंतर इंग्लंडवरुन दाखल झाले आहेत त्यांनी स्वत: तून जिल्हा रुग्णालय येथे संपर्क साधून या सर्वेक्षणात सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा

# ग्राहकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी ग्राहक कायद्याचे महत्व अधिक

### – जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले यांचे प्रतिपादन

अहमदनगर, दि. २४- ग्राहकांच्या हक्क अबाधित राखण्यासाठी राष्ट्रीय ग्राहक कायद्याचे महत्व अधिक आहे. या कायद्याच्या जागृतीबाबत प्रशासन आणि ग्राहक संरक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांची जबाबदारी अधिक असल्याचा सूर आजच्या राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उमटला. ग्राहक कायदयाचा हेतू आणि उद्देश समजावून घेऊन त्याबाबत ग्राहकांना माहिती मिळाली पाहिजे. तो ग्राहकांचा अधिकार असल्याचे प्रतिपादन यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले यांनी केले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत निवडणूकीच्या पार्श्र्वभूमीवर आदर्श आचारसंहितेचे पालन करीत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. राजेन्द्र भोसले अध्यक्षस्थानी होते. जिल्हा ग्राहक संरक्षण मंचाचे अध्यक्ष न्या. व्ही.एस. प्रेमचंदानी, न्यायिक अधिकारी चारु डोंगरे, कायदेविषयक अभ्यासक प्रज्ञा हेंद्रे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, निवासी उपजिल्हाधिकारी संदीप निचित, जिल्हा पुरवठा अधिकारी जयश्री माळी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.यावेळी डॉ. भोसले म्हणाले, ग्राहकांच्या हितासाठी असणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी करताना प्रशासनाची भूमिका खूप महत्वाची आहे. त्यामुळेच नव्या कायद्यात प्रशासनाला दिलेले अधिकारांचा वापर ग्राहकांच्या हितासाठी अधिकाधिक केला जाईल, यासाठी यंत्रणांनी पुढाकार घेतला पाहिजे. प्रशासनासोबतच ग्राहक चळवळीत काम करणाऱ्या संस्थांची जबाबदारी अधिक आहे. अधिकाधिक जनजागृती करुन, कायद्याची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवून त्यांना हक्काची जाणीव करुन देणे महत्वाचे आहे. सध्याच्या बदलत चाललेल्या परिस्थितीत ही भुमिका महत्वाची आहे. ग्राहकांनीही त्यांच्या हक्कांसाठी उपलब्ध असलेल्या व्यासपीठाचा उपयोग केला पाहिजे, असे त्यांनी नमूद केले.न्या. प्रेमचंदानी यांनी नवीन कायद्यातील तरतूदी आणि ग्राहकांच्या हक्कांबाबत त्याची अंमल-बजावणी याबाबत सविस्तर विवेचन केले. नव्या ग्राहक कायद्यात प्रत्येक गोष्टीशी निगडीत बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. सध्या ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने तसेच डिजीटल पद्धतीने व्यवहार वाढले आहेत. त्याबद्दलही नव्या कायद्यात ग्राहकांना संरश्रण तसेच फसवणूकीबद्दल दाद मागण्याची संधी असल्याचे त्यांनी सांगितले. ग्राहक संरक्षण कक्षाकडे दाखल झालेल्या दाव्यांच्या निराकरणाचे प्रमाण सुमारे ९२




टक्क्यांहून अधिक असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीमती हेन्द्रे यांनी सध्याचा कायद्याची व्यापक भूमिका स्पष्ट केली. सध्या ग्राहकांकडे क्रयशक्ती आहे. मात्र, खरेदी कौशल्य नसल्याने उत्पादक अथवा विक्रेत्यांकडून फसवणूक होण्याची शक्यता असते. या कायद्यान्वये अशा फसवणूक प्रकरणी दाद मागण्याचा हक्क ग्राहकांना मिळाल्याचे त्या म्हणाल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती माळी यांनी केले. यावेळी त्यांनी सादरीकरणाद्वारे कायद्याबाबत सविस्तर माहिती दिली.ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ हा दिनांक २० जुलै २०२० पासून लागू करण्यात आला आहे., सध्याच्या बाजारातील ऑफलाईन आणि ऑनलाईन खरेदी करणारा ग्राहक अशी ग्राहकाची विस्तारित व्याख्या करण्यात आली आहे. जिल्हा ग्राहक आयोग आणि राज्य ग्राहक आयोगोत दाखल करावयाच्या दाव्यांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. जिल्हा तक्रार निवारण आयोगात रुपये एक कोटीपर्यंत तर राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगात रुपये १० कोटी तसेच राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगात रुपये १० कोटीचे पुढील दावे दाखल करता येणार आहे. सुरुवातीच्या कायद्यात आधी विक्रेता किंवा सेवा जेथून घेतली असेल किंवा सेवा जेथून घेतली असेल तिथेच तक्रार दाखल करावी लागत होती. या कायद्यानुसार आता ग्राहक ज्या जिल्ह्यात राहत असेल तिथे तक्रार दाखल करता येणार आहे. कंपन्यांच्या भ्रामक व फसव्या जाहिरातींवर तक्रार आल्यास कारवाई करता येणार आहे.ई-फायलिंग हे या कायद्याचे वैशिष्ट्य असून तक्रारदार आता ऑनलाईन तक्रार दाखल करु शकतो तसेच सुनावणी, साक्षीपुरावे तपासणी यासाठी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहू शकतो.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सोनाली कुलकर्णी यांनी केले.

## कर्नाटक उच्च न्यायालयाचा येडियुरप्पा यांना झटका



बंगळुरू, दि.२४ - कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मुख्यमंत्री बी.एस.येडियुरप्पा यांना मोठा झटका बसला आहे. सरकारी नियंत्रणातून जमीन अवैधपणे मुक्त करण्याच्या प्रकरणी फौजदारी स्वरूपाची कारवाई रद्दबातल करण्यात यावी, अशी येडियुरप्पा यांची न्यायालयाने याचिका फेटाळून लावली. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री असताना येडियुरप्पा यांनी २००६ यावर्षी इन्फोटेक प्रकल्पाशी निगडीत जमीन सरकारी नियंत्रणातून मुक्त केली होती. ती प्रक्रिया अवैध असल्याचा आरोप करण्यात आला.त्यावरून लोकायुक्त न्यायालयाच्या आदेशावरून २०१५ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यातआला. त्यावरून येडियुरप्पा यांनी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. मात्र, त्यांना दिलासा मिळू शकला नाही. न्यायालयाने पाच वर्षे उलटूनही तपास पूर्ण न केल्याबद्दल लोकायुक्त पोलिसांना फटकारले. तसेच, खासदार आणि आमदारांशी संबंधित फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख ठेवण्याचा आदेशही विशेष लोकायुक्त न्यायालयाला दिला.

## माथाडी कामगारांना पाच लाखांची विमा सुरक्षा : अविनाश घुले

अहमदनगर – जिल्ह्यातील नियमित पगारघेणाऱ्या माथाडी कामगारांना अहमदनगर माथाडी कामगार मंडळाकडून कामगाराचा अपघाती मृत्यू झाल्यास पाच लाखाच्या अपघात विमा योजनेचा लाभ त्यांचे कुटुंबीयास मिळणार आहे. तसेच एक लाखापर्यंत वैद्यकीय खर्चासाठी विमा योजना लागू करण्यात आल्याचे अहमदनगर जिल्हा हमाल पंचायत अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे सहचिटणीस कामगार नेते अविनाश घुले यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.यापूर्वी माथाडी कामगारांना तीन लाख अपघात विमा व ७५ हजारापर्यंत वैद्यकीय विमा योजना घेण्यात आली होती.परंतु वाढत्या महागाईचा विचार करता माथाडी मंडळाचे अध्यक्ष सहायक कामगार आयुक्त चंद्रकांत राऊत यांच्याकडे पाठपुरावा करून जिल्ह्यातील माथाडी कामगारांना पाच लाख अपघात विमा व एक लाखापर्यंत वैद्यकीय विमा योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यास माथाडी मंडळाचे अध्यक्ष कामगार आयुक्त चंद्रकांत राऊत यांनी मंजुरी देऊन १४ डिसेंबर २०२० पासून जिल्ह्यातील माथाडी कामगारांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंबीयास पाच लाख अपघात विमा व एकलाखापर्यंत वैद्यकीय खर्चासाठी विमा योजना लागू करून या विमा योजनेचा संपूर्ण हप्ता अहमदनगर माथाडी मंडळाने भरला आहे. याकामी माथाडी मंडळाचे निरीक्षक सुनील देवकर यांचे सहकार्य लाभले असल्याचे अविनाश घुले यांनी सांगितले.

## लंगर सेवेने माणूसकीची भावना जागृत केली : आ. संग्राम जगताप

करोनात माणसे माणसापासून दुरावत असताना घर घर लंगर सेवेने सामाजिक कार्य उभे करुन माणुसकीची भावना जागृत केली, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.करोनाच्या पार्श्वभूमीवर शहरात मागील सात ते आठ महिन्यांपासून दीन-दुबळे व गरजूंची भुक भागविणाऱ्या घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करुन सामाजिक कार्याचा एक वेगळा ठसा उमटविणारे हरजितसिंह वधवा यांचा नगर- औरंगाबाद रोड येथील टॉपअप पेट्रोल पंप येथे गौरव करण्यात आला, यावेळी आ. जगताप बोलत होते. आमदार संग्राम जगताप व श्रीरामपूरचे विभागीय पोलीस उपअधिक्षक संदीप मिटके यांच्या हस्ते वधवा यांना गौरविण्यात आले. श्रीरामपूरचे विभागीय पोलीस उपअधिक्षक संदीप मिटके यांनी घर घर लंगर सेवेचे आपण स्वत: एक घटक राहून कार्य केले. हे सामाजिक कार्य जवळून पाहिल्याने भावनेच्या पलिकडे शब्दात न मांडता येणारी ही सेवा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी जनक आहुजा, प्रितपालसिंग धुप्पड, अनिश आहुजा, जतीन आहुजा, तरन नारंग, किशोर मुनोत, अमरजितसिंग वधवा, मनयोगसिंग माखिजा, सरबजितसिंग अरोरा, निप्पू धुप्पड, अभिमन्यू नय्यर, राहुल बजाज, कुकरेजा, विपुल शहा, सुनिल छाजेड, मोहन चोपडा, मनोज मदान, अतुल डागा, धनेश खत्ती, दिनेश भाटीया, राजा नारंग, बलजित बिलरा, सनी वधवा, वहाब सय्यद आदिंसह घर घर लंगर सेवा ग्रुप, तिरंगा ग्रुप व जीएनडी सेवा ग्रुपचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जनक आहुजा यांनी केले. आभार अनिश आहुजा यांनी मानले.

# प्रभू येशू ख्रिस्ताची शिकवण प्रेरणेतून आज समाज वाटचाल करीत आहे

**रेव्ह. ए. यु. कसाब**



अहमदनगर : - प्रार्थनास्थळे ही मानवी जीवनात अध्यात्म, शांतता व जगण्याचा उत्साह वाढवणारे प्रेरणास्रोत असून या माध्यमातून सत्कर्म करण्याची भावना जागृत होते, प्रभू येशू ख्रिस्ताची शिकवण प्रेरणेतून आज समाज वाटचाल करीत आहे, असे प्रतिपादन नाशिक धर्मप्रांत रेव्ह. ए. यु. कसाब यांनी केले. अहमदनगर पहिली मंडळी ( सी.एन.आय.) चा सतरावा वर्धापन दिन व नाताळ सण उत्साहात साजरा करण्यात येत आहे, यावेळी ते बोलत होते.यावेळी करोना विषाणू प्रादुर्भाव व संसर्ग रोखण्यासाठी शासनाने निर्बंध लावलेले असल्याने आजचा कार्यक्रम मर्यादीत स्वरुपात आयोजीत करण्यात आला होता. त्यानिमीत्त चर्च येथे आकर्षक विद्युत रोषणाई व सजावट करण्यात आली आहे.आमदार संग्राम जगताप यांनी चर्चला भेट देऊन वर्धापन दिन व नाताळनिमीत्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.यावेळी रेव्ह. एम. यु. कसाब.(बिशप. नाशिक धर्मप्रांत), रेव्ह.पॉल दुपारे (बिशप पुणे धर्मप्रांत),रेव्ह. संदीप वाघमारे, रेव्ह. डी. डी.सोनावणे, रेव्ह. सी. एन आठवले, नगरसेवक अविनाश (तात्या)घुले, सेक्रेटरी मनस्विनी सोंतले,खजिनदार सॅम्युअल खरात, प्रसन्ना शिंदे, अमोल लोंढे, अजित ठोकळ, शिरीष लाड, राहूल थोरात तसेच पास्टरेट कमिटी तरुण संघ ज्येष्ठ संघ, शब्बाथ शाळा आणि सर्व चर्च सभासद उपस्थित होते.

# मागासवर्गीय ठोकळ कुटुंबियांना जातीय द्वेषातून मारहाण

अहमदनगर । निर्मलनगर येथील मागासवर्गीय ठोकळ कुटुंबियांना जातीयद्वेषातून मारहाण झाल्याचा दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर निषेध नोंदवून निदर्शने करण्यात आली. सदर आरोपींवर अ‍ॅट्रोसिटी अ‍ॅक्ट व मोक्कातंर्गत कारवाई करण्याची व विविध मागण्यांची मागणी करण्यात आली. यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील,जिल्हाध्यक्ष संजय चांदणे,कडूबाबा लोंढे, सलीम सय्यद, रफिक शेख, चंद्रकांत सकट,प्रमोद शेंडगे, नागेश वायदंडे,रंगनाथ वायदंडे, मंदाकिनी मेंगाळ, रवींद्र भालेकर, दत्तात्रय बोरुडे, अविनाश लोंढे,बी.एस. विटेकर, बंडू पाटोळे,नामदेवराव चांदणे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.निर्मलनगर येथे गेली अनेक वर्ष मागासवर्गीय समाजातील ठोकळ कुटुंबीय राहत आहे. या भागात मागासवर्गीय समाजाचे कुटुंब मोजके असल्याने त्यांच्यावर नेहमीच जातीयद्वेषातून आरोपी दिपक सावंत त्रास देण्याचा प्रयत्न करीत असतो.नुकतीच ठोकळ कुटुंबीयांना आरोपी व त्याच्या दहा ते बारा साथीदारांनी मारहाण करुन घराचे नुकसान केले. त्यांच्या गाड्या जाळण्यात आल्या.सदर आरोपींवर अ‍ॅट्रोसिटी अ‍ॅक्ट व मोक्कातंर्गत कारवाई व्हावी, आळे (जि. पुणे) येथील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र आल्हाट यांच्या आंदोलनाची दखल घेऊन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागा मिळावी, नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथील दलित मतिमंद मुलीवर अत्याचार करून तिाा दगडाने ठेचून खून करणाऱ्या आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी.

## भिंगार शहराचा पाणीप्रश्न गंभीर

# आमदार संग्राम जगताप आणि भिंगार शहर शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकारी डॉ.राजेंद्र भोसले यांची भेट



भिंगार शहराचा पाणीप्रश्न गंभीर झाला आहे. सध्या एमआयडीसी पाणी योजनेतुन भिंगार शहरासह मिलीटरी एरियाला पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र प्रचलित पाणीपुरवठा व्यवस्था ही ४० वर्षांची जुनी असल्याने वारंवार नादुरुस्त होत असून पाणी पुरवठा नेहमीच विस्कळीत होत आहे. १० ते १२ दिवसांनी पाणी पुरवठा होत असल्याने भिंगार शहर वासियांची गैरसोय होत आहे. या समस्येवर कायम स्वरुपी उपाययोजना करण्यासाठी आ. संग्राम जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली होती. त्यानुसार आज बैठकीचे करुन प्रशासकिय स्तरावर प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत. यात अहमदनगर महानगरपालिकेच्या अमृत पाणी योजनेचे काम पुर्ण झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल असे मनपाचे अभियंता रोहिदास सातपुते यांनी सांगितले. तोपर्यंत कापूरवाडी तलावाच्या विहीरीतून भिंगार शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पाईपलाईन टाकण्याचा प्रस्ताव तयार करण्याचा सुचना जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिल्या. याच बरोबर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून बुहाणनगर चाळीस गाव पाणी योजनेतुन पाणी पुरवठा उपलब्ध होण्याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. बैठकीस छावणी परिषदेचे सीईओ विद्याधर पवार, अभियंता एस.एस. सोनवणे, मुसा सय्यद, संभाजी भिंगारदिवे, अजय भिंगारदिवे, नाथा राऊत, कलीम शेख, सुरेश मेहतानी,

# गुंडांना गावाबाहेब काढा : भाजपा

अहमदनगर जिल्हयात सध्या विविध तालुकामध्ये ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका इत्यादी निवडणुका चालू झालेले आहेत. तरी सर्व ठिकाणी कायदा व स्यव्यवस्था अबाधित राहणेसाठी सर्व गावामध्ये असलेल्या सराईत गुन्हेगार व अवैध व्यवसायात गुंतलेल्या व गंभीर स्वरूपाची गुन्हे दाखल असणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांना गावामध्ये / तालुक्यामध्ये येण्यास मज्जाव करणे गरजेचे आहे. सदर गावातील निवडणुका शांतताप्रिय मार्गाने पार पडतील असे निवेदन देऊन जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याशी चर्चा करण्यात आली. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अरुण मुंढे, युवराज पोटे, शामराव पिपळे, दिलीप भालसिंग, गणेश भालसिंग, सचिन भालसिंग, अंबादास बोठे आदी उपस्थित



होते.पुढे बोलताना मुंढे म्हणाले कि अवैध व्यवसायिक, गंभीर गुन्ह्यातील आरोपी, गाव गुंड यांना जर वेळीच आवार न घातला तर निवडणुकांच्या काळामध्ये कायदा सुव्यस्थाचे प्रश्ननिर्माण होऊ शकतो. त्यामुळे शांतता प्रिय निवडणुका होणासाठी पोलिस प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यानी सांगितले.

# शेतकऱ्यांच्या मुलांचा राळेगणसिद्धीत थाळीनाद आंदोलन

अहमदनगर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिल्लीत सुरु असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभागी व्हावे या मागणीसाठी आंदोलनातील शेतकऱ्यांच्या मुलांनी रविवार दि. २० डिसेंबर रोजी राळेगणसिद्धीत येत थाळीनाद आंदोलन केले. दिल्लीत आंदोलनास जागा मिळाल्यास शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेवटचे आंदोलन करू असे दिल्यानंतर आंदोलकांचे समाधान झाले.शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दोनदा आंदोलन केले, मोदी सरकारने दिलेले लेखी आश्वासन पाळले नाही. दिल्लीत सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनास माझा पाठींबा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर दिल्लीत रामलीला किंवा जंतर मंतर येथे जागा मिळाली तर या प्रश्नावर शेवटचे आंदोलन करणार असल्याचे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी रविवारी सांगितले.दिल्लीतील शेतकरी आंदोलनात हजारे यांनी सहभागी व्हावे यासाठी पंकज प्रकाश श्रीवास्तव (बिहार), मोहित शर्मा (दिल्ली), राजरतन शिंदे, प्रदिप मेटी, किरणकुमार वर्मा, सतिशकुमार राज पुरोहित (कर्नाटक) या सहा शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने रविवारी (२० डिसेंबर) राळेगणसिद्धी येथे अण्णा हजारे यांची भेट घेत सुमारे एक तास चर्चा केली. यावेळी हजारे बोलत होते.



शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने राळेगणसिद्धीत प्रवेश केल्यानंतर थाळी वाजवत आंदोलन करण्यास सुरुवात केली. हजारे यांच्या कार्यालयाकडून अण्णा भेटणार असल्याचे सांगितल्यानंतर थाळीनाद थांबवून त्यांनी हजारे यांची भेट घेतली. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता पोलिसाकडून मोठा फौज फाटा तैनात करण्यात आला होता. दिल्ली येथे केंद्र सरकार आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांना विविध प्रकारे त्रास देत आहे. या आंदोलनात २२ शेतकरी आतापर्यंत शहिद झाले आहेत. हजारे यांनी दिल्लीतील शेतकऱ्यांच्या आंदोलनात सहभाग घेतला तर आंदोलनाची ताकत निश्चितच वाढेल. आपल्याकडे संपूर्ण देश दुसरे गांधी म्हणून पाहत आहेत व तुम्ही आमचे प्रेरणास्थान आहेत. अशा भावना शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने व्यक्त केल्या.यावेळी हजारे म्हणाले, माझा केंद्र सरकारबरोबर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघर्ष सुरूच आहे. केंद्र सरकारला अनेकदा पत्रव्यवहारही केला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर २३ मार्च २०१८ ला दिल्लीत उपोषण सुरू केले होते. त्यावेळी पंतपधान नरेंद्र मोदी यांनी लेखी ओशासन दिले होते. त्यानंतर ३० जानेवारी २०१९ ला राळेगण सिद्धीत उपोषण सुरू केले होते. केंद्रीय कृषीमंत्री राधा मोहन सिंग व तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लेखी ओशासन दिले होते. परंतु, केंद्र सरकार दिलेले ओशासन पाळत नाही. केंद्र सरकारने ओशासन पाळत नाही. देशातील सर्व जेल ज्यावेळा भरून जातील त्यावेळी खऱ्या अर्थाने सरकारला जाग येईल. त्यासाठी देशातील शेतक-यांसह सर्व जनतेने रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. सरकार जर कोणत्या गोष्टीला घाबरत असेल तर त्यांनी सर्वात जास्त भीती ही पडण्याची असते. त्यामुळे दिल्लीतील शेतकरी आंदोलनात देशातील सर्व शेतकऱ्यांनी सहभागी झाले पाहिजे, असे हजारे म्हणाले. यावेळी माजी उपसरपंच लाभेश औटी, सुरेश पठारे, दादा पठारे, संजय पठाडे, गणेश भोसले, शाम पठाडे, अमोल झेंडे, अन्सार शेख,सुभाष पठारे, राजाराम गाजरे, सुनिल जाधव, शांताराम जाधव उपस्थित होते.

साप्ताहिक दर्शक

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१ महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

# मोफत नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया विभाग जिल्हा रुग्णालयात सुरू


छाया : अनिल शाह

अहमदनगर – कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे खबरदारी म्हणून जिल्हा रुग्णालयात मार्च महिन्यापासून नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया विभाग बंद ठेवण्यात आला होता. तो मंगळवारपासून सुरू करण्यात आला आहे. सर्व नेत्ररुग्ण व गरजूंनी मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तपासणी, डोळ्यांवरील ऑपरेशन व बाह्य रुग्ण तपासणीचा फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्स चिकित्सक डॉ. सुनील पोखरणा यांनी केले.जिल्हा रुग्णालयात कोव्हिड प्रादुर्भावानंतर प्रथमच सुरू करण्यात आलेल्या नेत्रतपासणी व शस्त्रक्रियेस रुग्णांची तपासणी करून प्रारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्स चिकित्सक डॉ. महावीर कटारिया, वैद्यकीय अधिकारी डॉ.मनोज घुगे, नेत्र शल्यचिकित्सक डॉ. संतोष रासकर, नेत्रतज्ज्ञ डॉ.भूषण अनभुले, डॉ. अजिता गरुड,नेत्रचिकित्सक अधिकारी डॉ. अशोक गायकवाड, सेविका सुजाता चक्रनारायण, योगेश सोनटक्के आदी उपस्थित होते.डॉ. पोखरणा पुढे म्हणाले, नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया सर्व मोफत असून, त्यात औषधे, रुग्णांचे जेवण,शस्त्रक्रिया, काळा चष्मा, भिंगरोपण हे सर्व मोफत दिले जाते. रुग्णाला एक दिवस ड्रेसिंगसाठी ॲडमिट केले जाते. भविष्यात जिल्हा रुग्णालयात नेत्ररोगसंदर्भातील सुपर स्पेशालिटी शस्त्रक्रिया उदाहरणार्थ रिटायनल सर्जरी, अत्याधुनिक काचबिंदू शस्त्रक्रिया, नेत्ररोपण शस्त्रक्रिया, तिरळेपणावरील सर्जरी या सुविधा उपलब्ध करण्याचा आमचा प्रयत्न असून, नेत्र विभागाचे भविष्यात विस्तारीकरण करण्याचे प्रयोजन आहे. डॉ. मनोज घुगे यांनी आभार मानले.

# देसवड्यात अवैध वाळू वाहतूक करणारा डंपर घेतला ताब्यात



अहमदनगर : पारनेर तालुक्यामध्ये वाळुउपसा करणाऱ्या वाहनांवर तहसिलदार ज्योती देवरे यांच्या पथकाने कारवाई केली. यावेळी वाळूने भरलेला डंपर ताब्यात घेण्यात आला असून त्यावर ३ लाख १६ हजार ५०८ दंड आकारण्यात आला आहे.पारनेर तालुक्यातील देसवडे येथील टेकुडवस्ती येथे पहाटे तीनच्या सुमारास तहसीलदार ज्योती देवरे यांनी छापा टाकला.यावेळी अवैधरित्या वाळू वाहतूक करत असताना एक हायवा तहसीलदार ज्योती देवरे यांच्या पथकाने ताब्यात घेतला आहे.सोमवार दि २१ रोजी मध्यरात्री १:३० सुमारास ही कारवाई करण्यात आली. तहसीलदार यांच्या पथकाने ही कारवाई केली.डंपरमध्ये ४ ब्रास वाळू असल्याचे निष्पन्न झाले हा हायवा राजू डोंगरे यांच्या मालकीचा असून तो तहसीलदार ज्योती देवरे यांच्या पथकाने पहाटे ताब्यात घेऊन तहसील कार्यालयाच्या आवारामध्ये आणून लावला आहे. त्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.तालुक्यामध्ये अवैधरित्या वाळू वाहतुकीचा प्रकार अनेक वेळा उघड झाला आहे. वेळोवेळी तहसिल पथकाने अनेक भागांमध्ये छापा टाकला आहे. यामध्ये अशा प्रकारचे वाहने ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचे कामकाज तहसिल विभागातून केले आहे तरीही वाळूमाफियाचा तालुक्यामध्ये सुळसुळाट झालेला दिसून येत आहेत अशा प्रकारचे अनेक डंपर अनधिकृतपणे वाळू वाहतूक करताना आढळून येत आहे यावर देखील कारवाई व्हावी अशी मागणी नागरिकांनी व्यक्त केली आहे. ढवळपुरी परिसरामध्ये अवैध वाळू वाहतूक करणारे वाहने मोठ्या प्रमाणात असल्याची माहिती वेळोवेळी तहसिल कार्यालयामध्ये मिळत आहे. त्यामाध्यमातून अशा प्रकारच्या कारवाया प्रशासनाकडून केल्या जात आहेत तरीही वाळूमाफिया अधिकाऱ्यांची नजर चुकून अशा प्रकारचे कृत्य करत आहेत त्यावर प्रशासन कडक पावले उचलून कारवाई करणार असल्याची माहिती तहसीलदार ज्योती देवरे यांनी दिली आहे.

# शेतकरी विरोधी कायद्याच्या निषेधार्थ ‘वंचित’चे कचेरीसमोर धरणे आंदोलन




अहमदनगर : महाराष्ट्र सरकारने शेतकरी विरोधी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यात दुरुस्ती करणारा अद्यादेश त्वरित काढावा व विधान सभेच्या हिवाळी अधिवेशनात शेती मालाला हमीभाव मिळण्यासाठी तरतूद करावी यासह शेतकऱ्यांच्या इतर मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात धरणे आंदोलन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. खा. ड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार झालेल्या या आंदोलनात पक्षाचे प्रवक्ते तथा प्रदेश महासचिव प्रा. किसन चव्हाण, आदिवासी भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सह समन्वयक डॉ. अरुण जाधव, जिल्हाध्यक्ष प्रतिक बारसे, महासचिव योगेश साठे, जेष्ठ सल्लागार जीवन पारधे, उपाध्यक्ष अरविंद सोनटक्के, बाळासाहेब कांबळे, चंद्रकांत नेटके, नंदकुमार गाडे, दत्तात्रय अंदुरे, ज्ञानदेव उच्छे, चंद्रकांत डोलारे, संतोष गलांडे, योगेश सदाफुले, बन्नू भाई शेख, सुनील बाळू शिंदे, फिरोज पठाण, भीमराव चव्हाण, सुरेश खंडागळे, वसंत नितनवरे, प्यारेलाल शेख, रवींद्र म्हस्के, अतिष पारवे,सोमनाथ भैलुमे, महेंद्र थोरात तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे स्वप्निल मोकळ, प्रकाश भालेराव, भूषण चव्हाण, संतोष कांबळे, आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. या धरण आंदोलनास राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे शहर जिल्हाध्यक्ष संतोष उदमले, युवक अध्यक्ष बाळासाहेब केदारे यांनी जाहीर पाठिंबा दिला. शेतकरी विरोधी जुलमी कायदे मंजूर करणाऱ्या केंद्र व राज्य शासनाचा निषेध करीत हे जुलमी कायदे रद्द करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. शेतमालाची वाहतूक करण्यासाठी मुख्यतः भारतीय रेल्वेचा वापर होतो या भारतीय रेल्वेचे खाजगीकरण करण्याचा केंद्र सरकारचा इरादा आहे. खाजगीकरनामुळे शेती मालाची वाहतूक प्रचंड खर्चिक होईल व सर्व सामान्य ग्राहकांवर वाढीव दराचे ओझे लादले जाईल. यामुळे रेल्वेच्या खाजगीकरनाचा निर्णय केंद्र सरकारने ताबडतोब रद्द करावा. दिल्लीत आंदोलन करीत असलेल्या आजच्या शेतकरी बांधवांच्या आंदोलनाने भारतीय रेल्वेच्या खाजगीकरनाला व मोदी सरकारच्या सर्व सार्वजनिक सेवांच्या खाजगीकरनाला विरोध करण्याची भूमिका घ्यावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले व या शेतकरी आंदोलनाला सक्रिय पाठिंबा जाहीर करण्यात आला.


नगर तालुक्यातील निंबळक येथील खंडोबाच्या मंदिरात चंपाषष्टी उत्सवात सहभागी झालेले भाविक. छाया : विजय मते

# प्रत्येकाने आपल्या घर पासून स्वच्छतेस सुरवात केल्यास आपले शहर स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही : महेंद्र गंधे

अहमदनगर : कोरोना महामारीमुळे आपल्याला स्वच्छतेचे महत्व समजले आहे. रोग– राईला लांब ठेवण्यासाठी सर्वत्र स्वच्छता असणे गरजेचे झाले आहे. प्रत्तेकाने आपल्या घर पासून स्वच्छतेस सुरवात केल्यास आपले शहर स्वच्छ होण्यास वेळ लागणार नाही. देशाच्या प्रगतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हातात झाडू घेवून स्वच्छता अभियान सुरु केले आहे. या अभियानात सर्व नागरिकांनी सहभागी होत आपल्या घरापासून स्वच्छतेस सुरवात करावी. भाजपच्या भिंगार मंडलाच्या वतीने स्वच्छ व प्लॅस्टिक मुक्त भिंगार होण्यासाठी सुरु केलेले जनजागृती अभियानाचे इतरांनी अनुकरण करावे, असे प्रतिपादन शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांनी केले. भिंगार छावणी परिषदेच्या वतीने १५ डिसेंबर पर्यंत भिंगार शहरात स्वच्छता पंधरवडाचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छता अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टीच्या भिंगार मंडलाच्या वतीने अध्यक्ष वसंत राठोड यांच्या संकल्पनेतून प्लॅस्टिक मुक्त भिंगार होण्यासाठी नागरिकांना कापडी पिशाव्याचे वाटप शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले छावणी परिषदेचे स्वच्छता निरिक्षक रमेश साके व गणेश भोर यांनी उपस्थित सर्वांना भिंगार शहर स्वच्छ व प्लॅस्टिक मुक्त ठेवण्याची सामुहिक शपथ दिली. यावेळी भिंगार छावणी परिषदेच्या सदस्य शुभांगी साठे, भाजपाचे माजी मंडल अध्यक्ष शिवाजी दहींडे, गणेश साठे,महिला आघाडी अध्यक्षा ज्योत्सना मुंगी, भिंगार युवा मोर्चा अध्यक्ष किशोर कटोरे,शहर युवा अध्यक्ष महेश तवले, ब्रिजेश लाडआदींसह नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविकात वसंत राठोड म्हणाले,भिंगार मध्ये भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून कायम लोकाभिमुख उपक्रम राबवले जात आहेत. नुकतेच छावणी परिषदेच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. या अभियानच्या समाप्ती निमित्त भिंगार भाजपच्या वतीने नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करून भिंगार शहर प्लॅस्टिक मुक्त होण्यासाठी जनजागृती केली आहे. त्यास नागरिकांनी उत्फूर्त प्रतिसाद दिला आहे. यावेळी प्रा. त्रीझा रॉक, सौरभ रसाने, संतोष हजारे, शुभम गवळी, सुमित राठोड, कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘विधूत’च्या फेरनिविदेवर कार्यवाही करा : ढोणे

अहमदनगर : पथदिव्यांच्या दुरूस्तीसाठी विद्यूत साहित्य खरेदी करणे, मानधनावर अभियंते व कर्मचारी नियुक्त करणे, वाहन खर्च यासाठी एकत्रित प्रसिद्ध केलेल्या निविदा तातडीने मार्गी लावावी, अशी मागणी उपमहापौर मालनताई ढोणे यांनी केली आहे. तसेच वीज बील कमी करण्यासाठी जादा वॅटचे दिवे बदलून तेथे एनर्जी सेव्हिंग पथदिवे बसविण्यात यावेत, अशीही त्यांनी मागणी केली आहे. या मागणीसाठी आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. महापालिका आयुक्त श्रीकांत मायकलवार यांना दिलेल्या निवेदनात ढोणे यांनी म्हटले आहे, की महापालिका हद्दीत ३५ हजार पथदिवे आहेत. याच्या दुरूस्तीसाठी विद्यूत साहित्य खरेदी करणे, मानधनावर अभियंते आणि विद्यूत कर्मचारी नियुक्त करणे, वाहनाचा खर्च आदीसाठी एक कोटी ५० लाख रुपये खर्च येतो. तसेच पथदिव्यांच्या बिलापोटी ४० लाख रूपये अदा करावे लागतात. आर्थिक अडचणीमुळे विद्यूत साहित्य उपलब्ध होत नसल्याने तसेच अपुरे कर्मचारी यामुळे तक्रारीत वाढ होऊन नागरिकांच्या रोषास नगरसेवकांना सामोरे जावे लागते. तसेच सध्याचे पथदिवे जास्त वॅटचे असल्याने वीज बील देखील जास्त येते. त्यामुळे दुरूस्ती, कर्मचारी मानधनावर घेणे आदी कामांसोबतच वीज बिलाची जबाबदारी खासगी संस्थेस देण्यासाठी फेरनिविदा काढण्यात आली होती. ती तातडीने मार्गी लावण्यासाठी कार्यवाही होण्याची गरज आहे. यातही महापालिकेचे जवळपास एक कोटी रुपये वाचणार आहेत. विद्यूत विभागाचा कार्यभार सध्या विद्यूत क्षेत्राचा अनुभव नसलेल्या अभियंत्याकडे देण्यात आलेला आहे. तांत्रिक ज्ञान नसल्याचे कारण सांगत संबंधित अभियंते कार्यवाही करत नाहीत. शहराच्या दृष्टीने आर्थिक दृष्ट्या फायदेशीर असलेल्या या कामासाठी प्रशासकीय प्रमुख म्हणून तातडीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. या निविदेची तांत्रिक छाननी व इतर प्रक्रिया अद्याप झालेली नसल्याने आगामी आठ दिवसात कार्यवाही करावी, अन्यथा आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन केले जाईल, असा इशाराही उपमहापौर मालनताई ढोणे यांनी दिला आहे.

## नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्या प्रयत्नातून

# कापड बाजारातील मस्जिदचा कर माफ




अहमदनगर : कापड बाजार येथील बोहरी समाजाची मस्जिद आहे. या मस्जिदला महानगरपालिकेने वाणिज्य दराप्रमाणे आकारलेला कर व त्यावर लावलेली शास्तीबाबत बोहरी मस्जिदच्यापदाधिकाऱ्यांनी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांना याबाबत माहिती दिली. नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी यात लक्ष घालून संबंधितांकडून माहिती घेऊन नियमाप्रमाणे जादा आलेला कर माफ करुन दिला. याबाबतचे पत्र नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी बोहरी समाजाचे धर्मगुरु शेख औनअली डुंगरपुरवाला यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी परेश लोखंडे, जमातचे सेक्रेटरी शेख अब्बासभाई, कमिटी मेंबर शेख हुसेनभाई, जोहेरभाई, शब्बीरभाई, सैफीभाई व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नगरसेवक बाळासाहेब बोराटे म्हणाले, कापड बाजार येथील बोहरी समाजाच्या मपिजद मध्ये फक्त धार्मिक कार्यक्रम होतात. त्यांचा व्यवसायिक वापर नसल्याने मनपाने चुकीच्या पद्धतीने संकलित कर आकारण्यात आला होता. वास्तविक पाहता मनपा अधिनियमन १३२(१) (ब) प्रमाणे फक्त धार्मिक कार्य होत असलेल्या ठिकाणी अशा पद्धतीने कर आकारणी करता येत नाही. याबाबत आम्ही मनपाकडे कायदेशिररित्या सातत्याने पाठपुरावा करुन चुकीच्या पद्धतीने लावण्यात आलेला कर मागे घेण्यास भाग पाडले. त्याचप्रमाणे नगरमधील कोणतेही धार्मिकस्थळ जसे मंदिर, मस्जिद, गुरुद्वारा, चर्च आदिंचा वापर जर व्यवसायिक होत नसले तर त्यांचाही कर कमी करण्यासाठी आमच्याशी किंवा मनपाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले. याप्रसंगी शेख अब्बासभाई म्हणाले, शासनाच्या नियमाप्रमाणे धार्मिक स्थळांचा जर वापरा व्यवसायिक होत नसले तर त्यांना त्याप्रमाणे कर आकारले जातात. परंतु या मस्जिद ट्रस्टला व्यावसायिक दराने मनपाने कर व शास्ती आकारली होती. याबाबत कायदेशीर बाबी लक्षात घेऊन नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांना याबाबत सांगितले, त्यांनी मनपाकडे पाठपुरावा करुन हा जादा कर कमी करण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे यापुढील काळात मस्जिद नियमाप्रमाणे नियमित कर भरले, असे सांगून याकामी मदत केल्याबद्दल श्री.बोराटे व मंगलताई लोखंडे यांचे आभार मानले.

# अहमदनगर महाविद्यालयात नाताळ सण उत्साहात साजरा



अहमदनगर- अहमदनगर महाविद्यालयात नाताळ सण हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत येत असतो.दरवर्षी २० ते २२ डिसेंबरमध्ये अहमदनगर महाविद्यालयात चॅपल (चर्च)मध्ये साजरा करण्यात येतो आणि यानंतर महाविद्यालयात सुट्टी जाहीर होते. यंदा कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे महाविद्यालये बंद असल्याने यंदाचा नाताळ उत्सव हा महाविद्यालयात साजरा होईल की नाही, याबाबत संभ्र होता. परंतु उत्साही विद्यार्थी आणि शिक्षकांनी मागील काही दिवसांपासून प्रचंड मेहनत घेत अथक परिश्रम करत प्राचार्य डॉ.आर.जे.बार्नबस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे नियोजन केले. आपली प्रॅक्टिस निरंतर सुरु ठेवत, आवश्यकतेनुसार भव्य दिव्य सेट तयार करण्यात आले. चर्चला रोषणाई केलेली आहे. विविध विद्यार्थ्यांच्या ग्रुप साँगने धमाल केली. अशा या पवित्र वातावरणात हा पवित्र नाताळ सण विद्यार्थी आणि काही शिक्षकांच्या मदतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे संपूर्ण प्रोफेशनल पद्धतीने चित्रीकरण करण्यात आले आणि२० डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. युट्यूब प्रिमिअरवर प्रसारित करण्यात आले. या ऑनलाईन नाताळ कार्यक्रमाचा समस्त आजी-माजी विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. हजारो लाईक्स मिळवत कार्यक्रमाचे चित्रीकरण संपूर्ण देश-विदेशात प्रसारित झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर.जे.बार्नबस म्हणाले, विविध सण उत्सव ही आपली संस्कृती आहे. या संस्कृतीतून आपणास अनेक गोष्टी शिकण्यास मिळतात.हे सण आपल्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. यातून आपणास उर्जा व प्रेरणा मिळत असते. सर्वांना एकत्र घेऊन एका धाग्यात गुंफण्याचे काम यानिमित्त होत असते. त्याचबरोबर संस्कृती व चाली-रितेचे आदान प्रदान यानिमित्त होत असते. सध्या कोरोनामुळे महाविद्यालय जरी बंद असले तरी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी नाताळ सणात खंड पडू न देता. 'शो मस्टगोऑन' हा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला. विद्यार्थ्यांनीही सोशल मिडियाच्या माध्यमातून या कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदविला, असल्याचे सांगून सर्वांना नाताळाच्या शुभेच्छा दिल्या. यासाठी प्रा. फिलिख अब्राहम, अरुण बळीद, विनय रननवरे, सुजाता लोंढे, उज्वला गायकवाड, श्रद्धा त्रिभुवन, सानिका जाधव, प्रा. प्रतुल कासाटे, प्रा. गौरव मिसाळ आदिंनी परिश्रम घेतले.




कभी यूँ मिलें कोई मसलेहत कोई खौफ दिल में जरा न हो ।
मुझे अपनी कोई खबर न हो तुझे अपना कोई पता न हो ।।
वो फिराक हो या विसाल हो तेरी याद महकेगी एक दिन ।
वो गुलाब बन के खिलेगा क्या जो चिराग बनके जला न हो ।।

बशीर बद्र

# काँग्रेस पक्षात महिलांना सन्मानाची वागणूक : काळे



अहमदनगर : काँग्रेस पक्षामध्ये महिलांना सन्मानाची वागणूक दिली जाते. ज्या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या सोनिया गांधी यांच्या निमित्ताने महिला आहेत त्या पक्षाकडे महिलांचा ओढा अधिक असणे स्वाभाविक बाब आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी केले आहे. कौसर खान यांच्यासह अनेक महिलांनी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यावेळी काळे बोलत होते. निजामभाई जहागीरदार, सेवादलाचे अध्यक्ष डॉ.मनोज लोंढे, डॉ.रिजवान अहमद यांच्या विशेष पुढाकारातून प्रवेश सोहळ्याचे आयोजन काँग्रेस कमिटीमध्ये करण्यात आले होते.यावेळी कौसर खान यांच्यासह शाहीन बागवान, अनुराधा भंडारे, यास्मिन शेख, शबाना शेख, सुरैय्या शेख, रुबीना बागवान,उमा छजलानी, जिलेदा शेख आदींसह अनेक महिलांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.शहर जिल्हाध्यक्ष काळे यांनी त्यांचे यावेळी पक्षात स्वागत केले.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष, महसूल मंत्री ना.बाळासाहेब थोरात, युवक काँग्रेसप्रदेशाध्यक्ष सत्यजित तांबे, आ. सुधीर तांबे यांच्या नेतृत्वाखाली पक्षामध्ये महिलांना योग्य ती संधी देण्याचे काम निश्चितपणे केल जाईल, असे यावेळी काळे म्हणाले.दीप चव्हाण म्हणाले की, काँग्रेस पक्षाला १३५ वर्षांची परंपरा आहे. इंदिरा गांधी, सोनिया गांधी या सारख्या सक्षम महिलांनी पक्षाचे नेतृत्व केले आहे. ज्येष्ठ नेते निजामभाई जहागीरदार म्हणाले की, काँग्रेसने प्रतिभाताई पाटीलयांच्यासारख्या एका महिलेला राष्ट्रपती होण्याची संधी देत महिलांचा बहुमान या देशामध्ये केला आहे. सेवादल अध्यक्ष डॉ. मनोज लोंढे म्हणाले की, सेवादलाच्या माध्यमातून महिलांना ताकद देण्याचे काम पक्षाच्यावतीने केले जाईल. डॉ. दिलीप बागल म्हणाले की, काँग्रेस पक्ष हा सर्वसमावेशक विचारधारेवरती चालणारा महिलांना येथे काम करण्यासाठी मोठी

# शहरातील नेहरू पुतळा अखेर रंग आणि प्रकाशाने झळाळला

अहमदनगर- शहरातील लालटाकी येथील स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा अनेक वर्षे दुर्लक्षित, व अंधारात गडप झालेल्या पुतळ्या समोर अखेर महापालिकेनेप्रकाशाची व्यवस्था केली, काटेरी झुडपे व गवताने भरलेला हा परिसर स्वच्छ करीत पुतळ्याला नवीन रंग देऊन झळाळी आणली. रसिक ग्रुपच्या मागणीची त्वरित गांभीर्याने दखल घेतल्याबद्दल आयुक्त श्रीकांत मायकलवार, व सर्व प्रशासन यांचेआभार मानण्यात आले. महापालिकेचे माजी नगरसेवक धनंजय जाधव यांनी स्वतः जातीने लक्ष घालून मोलाची साथ देत आपल्या प्रभागातील दिवे, तसेच सोलर दिवे ही सामाजिक व शहराच्या हिताचा विचार करीत उपलब्ध करून दिले.शशिकांत चंगेडे, उबेद शेख, प्रा. माणिक विधाते सर तसेच इलेक्ट्रिक विभागाचे व उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना धन्यवाद देण्यात आले. छोट्या छोट्या दुर्लक्षित गोष्टींनी शहराचे सौंदर्य बिघडत तर असतेच पण थोर पुरुषांचा आपण अपमान करीत असतो. अशी तत्परता शहर विकासासाठी मनापासून झाली तर राज्यकर्त्यांना जनतेच्या ह्रुदयात स्थान राहील. शहरातील वृत्तपत्रे व संपादक, पत्रकार यांची लेखणी शहरातील आत्मीयतेचे खूप काही प्रश्न सोडवू शकते हे ही पुन्हा पुन्हा सिध्द झालं.प्रकाशाचा एक कवडसा माझ्या शहराला सुखावून गेला, असे रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर यांनी म्हटले आहे.

# जिल्ह्यात दरोडा,महिला अत्याचार,कडक निर्बंध आणण्यासाठी पोलीस महानिरीक्षकांना पत्र

जिल्ह्यातील वाढते दरोड्याचे प्रकार आणि फसवणूक करणाऱ्या बुवांचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष पोलीस पथक स्थापन करण्यात यावेत, असा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षकांना केल्या आहेत. विशेष पोलीस महानिरीक्षकांना पाठविलेल्या पत्रात उपसभापती गोऱ्हे यांनी म्हटले आहे,की अहमदनगर जिल्ह्यात दरोडा, महिला अत्याचाराच्या प्रमाणात सातत्याने वाढ होताना दिसत आहे. कोठेवाडी, कोपर्डी येथील घटनांचा मागोवा घेतला तर अशा घटनांवर निर्बंध आणण्यासाठी पोलीस प्रशासनास विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. २० डिसेंबर २०२० रोजी पहाटे श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळा गावात दरोडा पडल्याची घटना समोर आली आहे. दरोडेखोरांनी विमल जाधव या ज्येष्ठ महिलेच्या घरातील ५० हजारांचा ऐवज चोरला. त्यांच्या कानातील दागिने खेचल्याने दोन्ही कानाच्या पाळ्या तुटल्याने त्या जळमी झाल्या. घरात महादेव जाधव व विमल जाधव हे दामप्त्य होते. दरोडेखोरांनी अगोदर घराची कडी वाजविली, प्रतिसाद मिळत नसल्याने दरवाजा उघडण्यासाठी धमकावले. शेवटी दरवाजा उघडला गेला. दरोडेखोरांनी आत येताच विमल जाधव यांना मारहाण करत त्यांच्या अंगावरील दागिने हिसकावले. विमल यांनी कानातील दागिने काढून देण्यास विरोध केल्याने दरोडेखोरांनी ते हिसकावले. तसेच जमिनीतून सोने काढून देतो, भरपूर धनलाभ करुन देतो, असे अमिष दाखवणाऱ्या भोंदूबुवांचे प्रस्थ वाढत आहे. अनेक नावे वापरुन फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारां विरोधात कडक कारवाईची गरज आहे. असे बुवा महिलांना जाळ्यात ओढतात. त्यातून अत्याचार झाल्याचे प्रकार समोर आलेले आहेत. नुकतीच या प्रकरणात एकावर कारवाई झालेली आहे. संबंधिताने कोणावर अत्याचार केले आहेत का, या संदर्भात महिलांना आवाहन करून माहिती काढावी व संबंधितावर कारवाई करावी. दरोडेखोरांचा वावर नाशिक, औरंगाबाद, नगर आणि बीड जिल्ह्यात जास्त असतो.




साप्ताहिक दर्शक

e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED
PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

R.N.I. NO.
MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO.
ANR/068/2018-2020

TO,